VOL- XI ISSUE- III MARCH 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

# ना. गोपाळ कृष्ण गोखले यांचे सामाजिक विचार

**हर्षल विरेंद्र चलवादी**
राज्यशास्त्र
संशोधक विद्यार्थी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.

**प्रस्तावना**

गोपाळ कृष्ण गोखले राजकीय विचारवंत व अर्थतज्ञ होते. सामाजिक विषयांतर्गत त्यांच्या विचारांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. त्या काळातील सामाजिक परिस्थितीचा विचार केल्यास असे दिसून येते की, सामाजिक सुधारणांना त्याकाळी विरोध होत असे. गोखले अशा परिस्थितीमध्ये विवेकशील, नैतिकपूर्ण, सामाजिक सुधारणाचे समर्थन करीत. राष्ट्र निर्मितीसाठी सामाजिक सुधारणामध्ये त्यांचा दृढ विश्वास होता. गोखलेंचा उदारवादी सामाजिक विचार हा सामाजिक असमानतेचा विरोध करतो. तसेच ते समता व आर्थिक दृष्टीकोनातून दलित वर्गाच्या उद्धारासाठी प्रयत्न करताना दिसून येतात. वस्तुत: ते एक अशी आर्थिक व्यवस्था व सामाजिक वातावरण निर्माण करण्याची आकांक्षा ठेवीत, जिथे व्यक्तीला आपला संपूर्ण विकास करण्याची संधी मिळेल. समान संधीवर आधारित सामाजिक न्याय व सामाजिक सुरक्षा यांची स्थापना करणे त्यांचे उद्दिष्ट होते. गोखलेंच्या सामाजिक विचारांच्या माध्यमातून आधुनिक विचारांचा मार्ग आपल्याला दिसून येतो. समाजामध्ये असणारे धार्मिक भेद, जातीय भेद, अशिक्षित लोक, राजकीय जागृती नसणे, स्त्रियांचे शोषण, सरकारी सेवेचे भारतीयकरण, स्त्री शिक्षण, शेतीवरील कर, भारतीय शिक्षण व्यवस्था, आर्थिक समस्या अशा सर्व सामाजिक प्रश्नावर गोखलेंनी आपले विचार मांडले व सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशाने आयुष्यभर कार्यरत राहिले.

## १) सामाजिक सुधारणा

सामाजिक सुधारणा बाबतीत गोखले न्या. रानडेंचे व सुधारक आगरकरांचे अनुयायी होते. आगरकरांच्या सुधारकात ते इंग्रजी मजकूर लिहित असत. जातीभेद नसावा, पुनर्विवाह व्हावे, अस्पृश्यता नाहीशी करावी असे त्यांचे म्हणणे होते. भारत सेवक समाजातील सभासदाने मी अस्पृश्यता नाहीशी करीन, पंथ व जात मानणार नाही. अशी शपथ घ्यावी लागते. भारत सेवक समाज राजकीय कार्याकरिता तर आहेच. परंतु सामाजिक बाबतीतच समाज जास्त कार्य करतो. दुष्काळ पीडीतांस मदत करणे, रोगाच्या साथी आल्या तर स्वयंसेवक पथके उभारणे, आरोग्याची व्यवस्था करण्यास झटणे, शिक्षण व धंदेशिक्षण या बाबी समाजिक कार्यक्षेत्रात येतात.

गोखलेंना भारतीय समाजातील उणीवा माहित होत्या. एकीकडे गरिबी व शिक्षणाच्या अभावी भारतीय समाजाचा जीवन स्तर खालचा होता. तर दुसरीकडे ते जातीय व सांप्रदायिक भेदांनी सामाजिक समस्यांनी ग्रस्त होते. समाजाचे नैतिक स्तर वाढविण्यासाठी जिथे त्यांनी शिक्षणाचे महत्त्व स्वीकारले. तसेच जन-जीवनाच्या अध्यात्मीकरणावरसुद्धा त्यांनी जोर दिला. नैतिकता व अध्यात्मीकरणाच्या माध्यमातून समाज प्रगल्भ होतो या प्रेरणेतूनच त्यांनी "भारत सेवक समाजाची" स्थापना केली. गोखलेंनी समाजिक विकास व सार्वजनिक कार्यामध्ये नैतिकता यावी यासाठी आजीवन प्रयत्न केले. गोखलेंनी आपल्या जीवनात राष्ट्रीय एकात्मतेला नेहमीच अग्रक्रम दिला आहे. भारतीय राष्ट्रवादाच्या वाढीची व विकासाची एक पूर्वअट म्हणून त्यांनी राष्ट्रीय एकात्मतेकडे पहिले आहे. त्यासाठीच जाती-जमातीमध्ये विभागलेल्या समाजाला एकसंघ राहण्याचा सल्ला ते देतात. त्याच बरोबर हिंदू-मुस्लीम ऐक्याचे ते महत्त्वाचे पुरस्कर्ते असून त्यांनी पुढे असेही म्हटले आहे की, खऱ्या अर्थाने हिंदू-मुस्लीम समाजामध्ये ऐक्य वा एकात्मता निर्माण झाल्या शिवाय भारत आपला उज्ज्वल भविष्यकाळ निर्माण करू शकणार नाही.

गोखलेंचे असे मत होते की, योग्य मूल्याधारित समाजिक सुधारणा शिवाय वास्तविक राष्ट्राची प्रगती व विकास अशक्य आहे. त्यांच्या मते भारताच्या ऱ्हासाची/पतनाची प्राथमिक कारण जाती व अस्पृश्यतावर आधारित सामाजिक असमानता आहे. गोखलेंच्या मते प्रगल्भ समाज निर्माण करण्यासाठी आधुनिक मुल्यांसोबत पुढे जाणे गरजेचे आहे. समाजिक सुधारणाच्या संबंधी गोखले एक वास्तववादी व उदारमतवादी विचारवंत होते. त्यांच्या संपूर्ण विचारांवर उदारमतवादाचा प्रभाव होता. यासंबंधी गोखलेंचे विचार लो. टिळकांच्या विचारांहून भिन्न होते. १८९१-९२ साली सरकारद्वारा मुलींच्या विवाहाचे वय दहा वर्षांवरून बारा वर्ष करण्याचे बिल पास करण्याची सुरवात झाली. तेव्हा गोखलेंनी सरकारच्या या निर्णयाला पाठींबा दर्शविला. परंतु लो. टिळकांनी या विधेयकास विरोध दर्शविला. समाजिक सुधारणा करायच्या असतील तर ब्रिटीशांच्या सुधारणावादी धोरणास पाठींबा द्यावा लागेल. ज्यामुळे जुन्या रूढी परंपरा ज्या अमानवीय आहेत अशांचा त्याग करून सामाजिक परिवर्तन करणे महत्त्वाचे ठरते. गोखले आपल्या उदारवादी विचारांच्या माध्यमातून शासनकर्त्यांच्या सदसद्विवेकबुद्धीला जागृत करण्याची आशा ठेवत असत.

**२) सामाजिक व राजकीय स्वातंत्र्य**

गोपाळ कृष्ण गोखले सामाजिक सुधारणेसाठी राजकीय प्रयत्नाचा विचार करीत. यासंदर्भात ते उदारमतवादी परंपरेचे समर्थक होते. उदारवादी परंपरेमध्ये राजा राममोहन रॉय हे या परंपरेमधील प्रथम भारतीय होते. त्यांनी सामाजिक सुधारणा करण्यासाठी राजकीय स्तरावर प्रश्न मांडण्याचे प्रयत्न केले. त्यांनी सतीप्रथा सारख्या अनिष्ठ सामाजिक प्रथांवर बंदी घालण्यासाठी राजकीय सहयोगाच्या माध्यमातून सुधारणावादी आंदोलनाचे नेतृत्व केले. त्यांचे असे स्पष्ट मत होते की अनिष्ठ सामाजिक परंपरा बंद करण्यासाठी सर्वानुमते सामाजिक एकमत झाले पाहिजे. ज्यामुळे वैधानिक मार्गाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन होऊ शकेल. बुद्धिवादी व प्रभावशाली लोकांच्या मदतीने राज्यास सामुदायिक विकासाच्या आदर्शावर आधारित सामाजिक परिवर्तनासाठी प्रयत्न करणे महत्त्वाचे ठरते. शिक्षित वर्ग हे जनतेचे नेतृत्व योग्य पद्धतीने करू शकतात. जिथे गोखले यांनी न्या. रानडेंच्या प्रभावाने आर्थिक विचारांचा अभ्यास केला. तर राजा राममोहन रॉय यांच्या परंपरातर्गत सामाजिक सुधारणेचा मार्ग प्रशस्त केला.

भारतीय उदारवादी विचारवंताच्या परंपरेमध्ये गोपाळ कृष्ण गोखले यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. गोखले यांच्या राजकीय विचारातील सर्वात महत्त्वाची विशेषता ही होती की त्यामध्ये आदर्शवाद व वास्तववाद यांचा अभूतपूर्व समन्वय आपल्याला दिसून येतो. गोखले कधीही अमूर्त आदर्शवादाच्या कल्पनेवर विचार मांडीत नसत. ते त्या विचारवंतापैकी एक होते जे सदैव वास्तविक विचार करीत असत. तत्कालीन परिस्थितीमध्ये काय संभव आहे आणि ते उचित आहे की नाही. राजकीय क्षेत्रात गोखलेंची महानता यावरून दिसून येते की म. गांधी सारखे स्वातंत्र्य आंदोलनाचे जनक त्यांनी ना. गोखलेना आपले राजकीय गुरु म्हणून संबोधले. तर कर्झन ने त्यांना विश्वातील महान राजकारणी म्हणून म्हटले.

राजकीय स्वातंत्र्या बरोबर सामाजिक सुधारणाही तेवढ्याच महत्त्वाच्या आहे असे गोखले यांचे मत होते. ना. गोखले व लो. टिळक या दोन्ही नेत्या मध्ये राजकीय स्वातंत्र्य व सामाजिक सुधारणा या प्रश्नवरून वाद निर्माण झाला होता. दोघांचाही दृष्टीकोन व मार्ग वेगळे होते. परंतु दोघेही राष्ट्रभावनेने प्रेरित होते. राजकीय स्वातंत्र्य तर मिळालेच पाहिजे परंतु सामाजिक सुधारणा जर झाल्या नाही तर स्वातंत्र्य मिळाल्यावर राज्य चालविण्यासाठी व स्वातंत्र्य टिकविण्यासाठी जी प्रगल्भता लागते ती अजून भारतीयांमध्ये निर्माण झालेली नाही. भारतीय समाजात असणारे धर्म, विविध जाती, विविध भाषा, संस्कृती, परंपरा, आणि मोठ्या प्रमाणात असणारी असाक्षरता यामुळे अराजकता निर्माण होऊन पुन्हा पारतंत्र्यात भारतीय जाऊ शकतात. म्हणून गोखलेंचे असे मत होते की ब्रिटीशांचा आधुनिक दृष्टीकोन, आधुनिक विचार यांचा आपण स्वीकार करून समाजिक सुधारणा घडवून आणून प्रगल्भ अशा समाजाकडे स्वातंत्र्य दिल्यास ते योग्य होईल. ते टिकू शकेल व भारत पुन्हा आपल्या उच्च अशा सामाजिक मुल्यांची, संस्कृतीची जगाला ओळख करून देण्यास समर्थ होईल.

**३) परिवर्तनाचे मार्ग.**

गोखले यांनी नेहमीच स्वराज्याचे महत्व अधोरेखित केलेले होते. परंतु स्वराज्य मिळविण्याचा मार्ग हा घटनात्मक असायला हवा असे त्यांचे मत होते. परिवर्तनासाठी

घटनात्मक मार्ग हाच विधायक असतो. कारण त्यामुळे कोणतीही व्यवस्था उध्वस्त होत नाही. तर त्यातून अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेत अधिकाधिक रास्त बदल घडवून आणण्यास मदत होते. गोखलेंच्या घटनात्मक मार्गामध्ये निशस्त्र प्रतिकार, कर न देणे, अहिंसा आदीसारख्या विधायक मार्गाचा समावेश होता. गोपाळ कृष्ण गोखले यांनी साध्यांपेक्षा साधनांनाच प्राथमिकता दिलेली आहे. त्यांनी राजकारणाच्या आध्यात्मिककरणावर भर दिला होता. गोखले यांचा राजकारणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन धार्मिक होता. गोखले यांनी मांडलेली ‘राजकीय आध्यात्मिकरण’ही कल्पना प्रभावी ठरली. सार्वजनिक जीवनात सत्य, साधन, प्रामाणिकपणा, त्याग, पवित्रिता यांना महत्व दिले पाहिजे. असे गोखले सूचित करतात. गोखलेंनी राजकारणाला नैतिक व अध्यात्मिक अधिष्ठान प्राप्त करून दिले.

राजकीय अध्यात्मिकरणाच्या मध्यमातून राजकारणात कार्यशील राहता येते. उच्च मानवी मुल्यांचा विकस त्यामाध्यमातून साधता येऊ शकतो. राजकारणामध्ये वावरताना समाजामध्ये आदर्श निर्माण करणे हे राजकीय अध्यात्मिकरणाच्या माध्यमातून शक्य आहे असे त्यांचे मत होते. गोखले परिवर्तनासाठी विधायक मार्गाचा, सत्याचे मार्गाचे अवलंब करण्याचे सूचित करतात. लो. टिळक आणि ना. गोखले यांच्या दृष्टीकोनात साधन आणि लक्ष्य या दोन्ही बाबतीत गंभीर भेद होते. परंतु दोघातील देशभक्ती, देशसेवेची भावना आणि राष्ट्रहिताला कोणत्याही बाबतीत सर्वोपरी मानण्याची प्रवृत्ती निसंशय होती. दोघांमध्ये तीव्र मतभेद होते तरीसुद्धा दोघांच्या मनामध्ये एकदुसऱ्याच्या प्रती व्यक्तिगत आदर सम्मान होता.

**४) शैक्षणिक विचार**

ना. गोपाळ कृष्ण गोखले यांच्या चरित्राकडे पाहिले असता असे दिसून येईल की त्यांचे जीवन आणि कार्य राष्ट्राच्या शिक्षण आणि राजकीय प्रगती या दोन मुख्य विषयांवर केंद्रित झालेले होते. १८८४ साली ते न्यु इंग्लिश स्कूल मध्ये नोकरीस लागले. तेव्हापासून १९१५ साली ते मृत्यू पावले तोपर्यंत त्यांच्या ३० वर्षाच्या कार्यरत काळापैकी अठरा वर्षे त्यांनी शिक्षक म्हणून काढली. नंतरच्या काळात राष्ट्रीय राजकारणाच्या विशाल क्षेत्रात त्यांनी जी कामगिरी बजावली ती आमच्या मते शिक्षक म्हणून त्यांनी आधी केलेल्या कामगिरीचीच एक विकसित अवस्था होती. म्हणूनच राजकीय पुढारी म्हणून त्यांनी केलेल्या कार्याचे योग्य आकलन व मुल्यांकन करण्यासाठी त्यांनी शिक्षक म्हणून केलेले कार्य समजून घेणे आवश्यक आहे. गोखलेंच्या शैक्षणिक कार्याचे स्वरूप द्विविध आहे. पहिले विद्यादानाच्या क्षेत्रात अध्यापक, आजीव सभासद, संचालक व विद्यापीठाचे फेलो म्हणून दुसरे, विद्यादानाच्या खेरीज अन्य क्षेत्रात शिक्षणाचा पुरस्कार करणारा थोर राजकीय पुढारी म्हणून त्यांचे शैक्षणिक योगदान दिसून येते. काळाच्या पुढे जाऊन तत्कालीन समाजाला व राजकर्त्यांना पटणार नाही अशी भूमिका घेऊन भविष्यातील भारतीय समाज हा सुशिक्षित साक्षर असावा या दृष्टीकोनातून त्यांनी आपले शैक्षणिक विचार मांडले.

**समारोप.**

ना. गोपाळ कृष्ण गोखले यांनी आपल्या विचारांच्या माध्यमातून सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचा नेहमी प्रयत्न केला. ना. गोखले यांनी नेहमी सामाजिक सुधारणांना प्राध्यान्य दिले. स्वातंत्र्य स्वराज्याची मागणी बरोबर सामाजिक सुधारणा ही तितकेच महत्त्वाचे आहे असे त्यांनी आपले विचार मांडले. राष्ट्रस स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राष्ट्र चालवण्यासाठी योग्य व्यक्ती शासन कारभाराची माहिती असलेली लोक आपल्या राष्ट्रात असणे गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षणाचे महत्व देखील आपल्या विचारांच्या माध्यमातून मांडले. सामजिक प्रगती त्यांना अत्यंत महत्वाची होती. ना. गोपाळ कृष्ण गोखले यांचे विचार चिंतनशील वाटतात.

**संदर्भसूची :**

१) कुमार, सतिश, उदारवाद और गोपाल कृष्ण गोखले, महाराष्ट्र परिचय केंद्र, महाराष्ट्र शासन, नवी दिल्ली, पृ. ८९
२) कित्ता, पृ. ९२
३) फाटक, हनुमंत, विचारमंथन जर्नल, VOL-2, २०१५, पृ. १८-१९
४) साने, पांडुरंग सदाशिव, नामदार गोपाळ कृष्ण गोखले, व्हीनस प्रकाशन, पुणे, पृ. २६५
५) पारसनीस, श्री. रा., गोपाळ कृष्ण गोखले चरित्र, चित्रशाळा प्रेस, पुणे, १९३३, पृ. १४

६) कुमार, सतिश, उदारवाद और गोपाल कृष्ण गोखले, महाराष्ट्र परिचय केंद्र, महाराष्ट्र शासन, नवी दिल्ली, पृ. ११५
७) देवगिरीकर, टी. आर., आधुनिक भारत के निर्माता गोपाळ कृष्ण गोखले, दिल्ली सूचना एव प्रसारण मंत्रालय, दिल्ली., पृ. ५४